**<u>ठळक बातम्या</u>**

- वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन, 'वंदे मातरम्' हा एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न आणि एक संकल्प असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचार शिगेला

- महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर न करायच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उच्च न्यायालयाकडून राज्य निवडणूक आयोगाला नोटिस

- क्रिकेट विश्वचषक विजेत्या महिला संघातल्या महाराष्ट्रातल्या खेळाडूंचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**आणि**

- ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांच्यावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाची आज सुरुवात झाली. हे गीत बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी दीडशे वर्षांपूर्वी लिहिलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं 'वंदे मातरम्' शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं उद्घाटन केलं. 'वंदे मातरम्' हा एक मंत्र आहे, एक ऊर्जा आहे, एक स्वप्न आणि एक संकल्प आहे, असं प्रधानमंत्र्यांनी या कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितलं. हे गीत म्हणजे भारतमातेप्रति भक्ती आणि आदर व्यक्त करणारा भाव आहे, जो आपल्याला इतिहासाशी जोडतो, वर्तमानात आत्मविश्वास निर्माण करतो आणि भविष्यासाठी नवसंजीवनी देतो, असंही ते म्हणाले.

**होल्ड-- बाईट - प्रधानमंत्री**

या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी एक विशेष टपाल तिकीट आणि नाणं प्रकाशित केलं. तसंच 'vandemataram150.in' हे विशेष पोर्टलही सुरू केलं. वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त देशभरात वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रीय गीत वंदे मातरमच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त अभिवादन केलं आहे. स्वातंत्र्यसमराच्या काळात ब्रिटिशांच्या विरोधात संन्यांशांनी पुकारलेल्या बंडाच्या वेळी बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी या अमर गीताची रचना केली होती, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला अभिवादन केलं. हे राष्ट्र भावना जागवणारं आणि पिढ्यांना प्रेरणा देणारं शाश्वत गीत आहे, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

हे राष्ट्रीय गीत भारताच्या सामूहिक चेतनेचं प्रतीक आहे, असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

वंदे मातरम शतकोत्तर सुर्वणमहोत्सवानिमित्त देशात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान आणि संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग यांनी आज राष्ट्रीय गीताचं स्मरण केलं.

नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवनातही आज वंदे मातरम गायनाचा कार्यक्रम झाला. अनेक कलाकारांनी एकत्र येऊन राष्ट्रीय गीत गायलं. वृत्त विभागाचे अतिरिक्त महासंचालक धीरज काकडीया या कार्यक्रमाला उपस्थित होते.

मुंबईत मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत वंदे मातरम् गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं. मुंबई विद्यापीठात यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांच्यासह १२ हजाराहून अधिक विद्यार्थी समूहगानात सहभागी झाले होते.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचा प्रचार शिगेला पोचला आहे.

भाजपा बिहारला विकसित राज्य बनवेल, असं भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र **मोदी** यांनी आज औरंगाबाद इथल्या सभेत सांगितलं. राजद आणि काँगेसनं बिहारच्या युवावर्गाला भरकटवण्याचा प्रयत्न केला अशी टीका प्रधानमंत्र्यांनी भाबुआ इथल्या प्रचारसभेत केली.

बिहारमध्ये सत्ता मिळताच राज्याला पूरमुक्त करण्यासाठी स्वतंत्र मंत्रालय सुरु केलं जाईल, असं आश्वासन भाजपाचे नेते अमित **शहा** यांनी एका प्रचार सभेत दिलं. भाजपा अध्यक्ष जे पी **नड्डा** यांनी गोविंदगंज इथं, तर उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी **आदित्यनाथ** यांनी पूर्व आणि पश्चिम चंपारण जिल्ह्यात सभा घेतल्या.

काँग्रेस नेते राहुल **गांधी** यांनी अमरपूर इथं सभा घेतली. बिहारच्या जनतेनं अडचणीच्या काळात त्यांच्या सोबत उभं राहणारं, त्यांच्यासाठी काम करणारं सरकार निवडावं, असं आवाहन त्यांनी केलं. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन **खर्गे** यांनी रोहतास मधल्या चेनारी इथं सभा घेतली.

महागठबंधनचे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार **तेजस्वी प्रसाद यादव** यांनी पूर्णिया, अरारिया, भागलपूर आणि बांका इथं प्रचार सभा घेतल्या.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर न करण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठानं आज राज्य निवडणूक आयोगाला नोटिस बजावली आणि पुढच्या आठवड्यापर्यंत आपलं म्हणणं मांडायचे निर्देश दिले. काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडघे यांनी याबाबत दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली.

**<><><><><>**

ICC महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ चं विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघातल्या स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रिग्ज आणि राधा यादव, या महाराष्ट्रातल्या तीन खेळाडूंचा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या वर्षा निवासस्थानी सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी या तिघींना शाल, पुष्पगुच्छ, तसंच प्रत्येकी सव्वा दोन कोटी रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित केलं. तर या संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना साडेबावीस लाख रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित केलं. महिला क्रिकेट संघाच्या सहाय्यक कर्मचारी वर्गालाही ११ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल दीर्घ आजारानं निधन झालं. त्या ७१ वर्षांच्या होत्या. सुलक्षणा पंडित यांनी पार्श्वगायनानं आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यांनी हिंदी, मराठी, बंगाली, उडिया आणि गुजराती, या भाषांमध्ये गाणी गायली आहेत. सत्तरच्या दशकात त्यांनी अभिनयाची वाट चोखाळली. उलझन, संकोच, हेरा फेरी, अपनापन, खानदान, धर्म कांटा अशा विविध हिंदी चित्रपटांमधून त्यांनी भूमिका साकारल्या.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या अंगोला आणि बोत्सवाना या देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. अंगोलाच्या अध्यक्षांच्या निमंत्रणावरून त्या प्रथम अंगोला देशाला भेट देतील. अंगोलाच्या ५० व्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमातही त्या सहभागी होतील. त्यानंतर ११ नोव्हेंबरला त्या बोत्सवानाला जातील. त्या बोत्स्वानाच्या अध्यक्षांबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील. तसेच तिथल्या संसदेला संबोधित करतील.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी वाराणसीला पोहोचले असून नागरिकांनी तसंच पक्ष कार्यकर्त्यांनी त्याचं जल्लोषात स्वागत केलं. वाराणसी दौऱ्यात उद्या प्रधानमंत्री मोदी चार नवीन वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवतील.

बनारस-खजुराहो, लखनऊ-सहारनपूर, फोरिझपूर-दिल्ली आणि एर्नाकुलम-बंगळुरू या मार्गांवरून या नवीन गाड्या धावणार आहेत. या गाड्यांमुळे नागरिकांचा प्रवासाचा वेळ वाचेल तसंच तिथल्या पर्यटनाला चालना मिळणार आहे.

<><><><><>

भारतातल्या बँका एका दशकापूर्वीच्या तुलनेत आता खूप प्रगल्भतेनं काम करत आहेत, असं प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज केलं. ते मुंबईत भारतीय स्टेट बँकेच्या बँकिंग आणि आर्थिक विषयावरच्या परिषदेत बोलत होते.

<><><><><>

गोव्यात होणारा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव- ईफ्फी हा भारतीय निर्मात्यांना जागतिक स्तरावर पोहोचविणारा एक महत्त्वाचा दुवा ठरेल, असा विश्वास माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी व्यक्त केला आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. २० नोव्हेंबरपासून इफ्फी चित्रपट महोत्सवाला सुरुवात होणार असून यात ८१ देशांतील २४० चित्रपट प्रदर्शित

होणार असल्याची माहिती मुरुगन यांनी दिली. हा महोत्सव २८ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.

<><><><><>

नवी दिल्ली इथल्या राष्ट्रीय संग्रहालयात ठेवलेले भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष उद्या अकरा दिवसांच्या प्रदर्शनासाठी भूतानला पाठवले जाणार आहेत. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार हे या अवशेषांना घेऊन जाणाऱ्या शिष्टमंडळाचं नेतृत्व करतील.

<><><><><>

नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

<><><><><>

भारत-ऑस्ट्रेलिया टी २० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना उद्या होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी पावणे दोन वाजता ब्रिस्बेनमधे हा सामना सुरू होईल.

//<><><><><>//